# एक नवीन योजना

**समाजस्वास्थ्याचें पत्रलेखनमंडळ**-या मासिकांत प्रतिपादलेलीं मतें ज्यांस पसंत असतील अशा लोकांत परस्पर विचारविनिमय व सहकार्य व्हावें असें आम्हास बरेच दिवसांपासून वाटत आहे खाजगी पत्रें लिहून कोणत्याही विषयाची चर्चा करतां आल्यास त्यांतून अनेक गोष्टी निष्पन्न होण्याचा संभव आहे. उदाहरणार्थ एखादे ठिकाणीं नग्नसंघ काढतां येईल. अर्थात् ओळख झाल्यावर तिचा उपयोग कसा करायाचा हें ज्याचें त्याने ठरवायचें आहे. परंतु ही ओळख करण्याची संधि देण्याकरता आम्हा पुढील योजना आंखली आहे तींत कोणास फेरफार सुचविणें असल्यास त्याचा विचार करूं.

१. या मंडळांत ज्यांना यायचें असेल त्यांना वर्षाची दोन रुपये वर्गणी आमचेकडे भरावी लागेल. वर्गणीचें वर्ष कोणत्याही महिन्यापासून सुरू करतां येईल, मात्र पुरी वर्षाची वर्गणी भरली पाहिजे. वर्गणीबरोबर स्वतःचें लिंग, वय (१८ वर्षांचे वर असावें), जात (जातीचें महत्व आम्हास नाही, परंतु कांहींस वाटेल), शिक्षण, धंदा, मिळकत, व पत्रव्यवहाराचे विषय व भाषा, ( व वाटल्यास फोटो ) इतकी माहिती पाठवावी व ओळख कशा प्रकारच्या स्त्रीपुरुषांची पाहिजे हेंही लिहावें. म्हणजे आम्ही त्यांना दोनतीन दिवसांचे आंत आमचे यादींत त्या प्रकारचीं माणसें जितकीं असतील त्यांचीं नांवें व पत्ते कळवूं व जसजशीं नवीन येतील तसतशीं कळवीत जाऊं. अर्थात् सर्वच नांवें प्रत्येकास कळवणार नाही, इच्छित पत्रव्यवहारास योग्य अशींच नांवें कळवूं. वर्गणी मनीआर्डर, पोस्टल आर्डर, चेकने किंवा रोख आली पाहिजे, व चेक बाहेरगांवचा असल्यास चार आणे जास्त पाठवले पाहिजेत. एकदा ओळख झाल्यावर पत्रव्यवहार परस्पर करतां येईल, त्यांत आमचा संबंध नाही.

२ कोणास कोणत्याही कारणाने घरच्या पत्त्यावर पत्रें मागवणें नसल्यास तीं 'C/o पोस्ट् बॉक्स् ३५२५, मुंबई, नं. ४' या पत्त्यावर मागवतां येतील

व नतर तीं आमचेकडून न्यावीं लागतील. अर्थात् याचा फायदा फक्त मुंबईतील लोकांसच मिळेल व त्याकरतां वर्षाचे दोन रुपये अधिक वर्गणी पडेल. **एकंदर रु. ४**

३. कोणास टोपणनांवाने पत्रव्यवहार करणें असल्यास वरीलप्रमाणे पत्ता व टोपणनांव एवढेंच लोकांस कळवूं व असें पत्र आल्यावर आमचेकडे खरें नांव व पत्ता नोंदलेला असल्यास आम्ही तें दुसऱ्या पाकीटांत घालून वर खरा पत्ता लिहून पाठवूं. याबद्दल ट. ख. करतां आणखी रु. १ आरंभीं भरावा लागेल, व तो संपल्यावर पुन्हां रु. १ भरावा लागेल. **आरंभीं एकंदर रु. ५.**

४ आम्ही आपलें काम चोख रीतीने करूं असा ज्यांना विश्वास असेल, त्यांनीच या मंडळांत यावें, तक्रारी लोकांनी येऊं नये. एकदा भरलेली वर्गणी कोणत्याही सबबीवर परत मिळणार नाही. मंडळांत पुरेशा स्त्रिया न आल्यामुळे अशीं मंडळें चालत नाहीत असा अनुभव एकाने आम्हास लिहिला आहे. तसें झाल्यास आम्हासही ही योजना बंद करावी लागेल.

संपादक.

---

# एक नास्तिक तत्त्ववेत्ता–दीदरो

फ्रान्समध्ये १८ व्या शतकांत दी द रो नांवाचा एक प्रख्यात तत्त्ववेत्ता होऊन गेला त्याचें जीवनचरित्र बोध घेण्यासारखें आहे.

त्याचा जन्म १७१३ सालीं ' लांग्र ' नांवाच्या लहानशा शहरांत झाला. त्याच्या बापाचा धंदा चाकूकातऱ्या वगैरे बनवण्याचा होता आणि जवळ बराच पैसा झाल्यामुळे त्याने आपल्या मुलाला शिक्षण देऊन प्रतिष्ठित बनवण्याच्या विचाराने त्याला ' जेसुइट् ' लोकांच्या शाळेंत घातला. तेथे त्याने आपल्या तीव्र बुद्धीच्या जोरावर अनेक बक्षिसें मिळवलीं. नंतर बाराव्या वर्षी त्याला पुढील

शिक्षणाकरता पॅरिस येथे पाठवलें, पण अजूनही तो जेझुइटांच्याच ताब्यांत होता, म्हणजे त्याचें शिक्षण कट्टर धार्मिक पद्धतीने झालें हें वेगळें सांगणें नको. तेथे त्याचें शिक्षण संपल्यावर त्याच्या बापाने त्याला वकील किंवा धर्मोपदेशक यांपैकीं एखादा धंदा पसंत करण्यास सांगितलें, पण त्याने एकही पसंत केला नाहीं. नंतर बाप म्हणाला, ' डाक्टर हो. ' तेव्हा तो म्हणाला, ' लोकांना मारण्याची माझी मुळीच इच्छा नाहीं. '

रांदाँ नामक एका श्रीमंताकडे तो शिक्षक म्हणून राहिला, पण तेथे तो कांही महिन्यांवर टिकला नाही आणि नंतर गरीबींत रहावें लागलें. १७४२ सालीं त्याची ' ॲन्–त्वानेत् शांपिआँ ' नांवाच्या मुलीशीं ओळख झाली व आणखी एका वर्षाने त्याने तिच्याशीं लग्न केलें. निर्वाहाकरिता त्याने एका प्रकाशकास कांही पुस्तकांचीं भाषांतरें करून दिलीं.

१७४९ सालीं ' दॅलांबेर् ' नामक लेखकाचे मदतीने फ्रेंच ज्ञानकोश लिहिण्याचें काम त्यावर सोंपविण्यांत आलें, पण या कामांत त्याचे अत्यंत हाल झाले. एकदा त्याला तुरुंगांत जावें लागलें, दॅलांबेर् त्याला सोडून गेला, ज्ञानकोशाचा धार्मिक भाग लिहिण्याचें काम त्याने जेझुइटांना न दिल्यामुळे त्यांनी त्याचा छळ केला, छापखानेवाल्याने त्याच्या हस्तलिखिताबरहुकूम न छापतां त्यांतील कांही भाग गाळला आणि कांहींत त्याला सांगितल्याशिवाय फरक केला, आणि धार्मिकांच्या कारस्थानामुळे राजाने देखील मध्ये पडून ज्ञानकोश छापण्यास बंदी केली. तथापि हें पुस्तक अखेर प्रसिद्ध झालेंच.

लग्नानंतर थोड्याच दिवसांत त्याचा ' मॅदॅम् द प्वीझिअ ' नांवाच्या विधवेशीं संबंध जडला. तिला पैसे देण्याकरता त्याने ' तात्विक विचार ' नांवाचा ग्रंथ लिहिला. यांत धर्माची फिकीर केली नसल्यामुळें त्याचे बिरुद्ध काहूर उठलें आणि हा भयंकर मनुष्य आहे असें पोलिसाने राजाला कळवलें. ही गोष्ट पार्लमेंटपर्यंत पोंचून त्यांनी तें पुस्तक जाळण्याचा हुकूम सोडला. नंतर तिलाच पैसे देण्याकरता त्याने ' आंधळ्यांविषयीं पत्र ' लिहिलें.

त्याच्या नास्तिकपणामुळें राजाने त्याला तुरुंगांत टाकलें, पण कांही मित्रांच्या मध्यस्थीने त्याला तीन महिन्यांनीं सोडून दिलें. मध्यंतरी मॅदॅम् द प्यांझिअचें त्याशीं पटत नाहींसें झालें होतें. यानंतर सात वर्षांनी म्हणजे १७५६ सालीं त्याची ' मादम्वाझेल व्हॉलां ' नामक अविवाहित स्त्रीशीं ओळख झाली व त्यांचे इतकें प्रेम जमलें की तें मरेपर्यंत टिकलें. या दोन बायांशीं जरी त्याने संबंध ठेवला, तरी तो आपली बायको व मुलगी यांजबरोबरच रहात होता इतकेंच नव्हे, तर तो उत्तम बाप होता आणि त्याला आपल्या बायकोविषयीं प्रेम व आदर वाटत असे, असें त्याच्या मुलीनेच लिहून ठेवलें आहे.

त्याच्या कुटुंबाचा खर्च जेमतेमच भागत असे आणि एकदा गरिबीमुळे त्याला आपला ग्रंथसंग्रह विकावा लागला. तो रशियाच्या राणीने १७६५ सालीं १५ हजार पौंडाला विकत घेतला, आणि तो त्याच्याच ताब्यांत देऊन त्याची काळजी घेण्याबद्दल त्याला हजार पौंडांचें वर्षासन नेमून दिलें. तो काय करतो हें पहाण्याकरता हें वर्षासन दोन वर्षेंपर्यंत दिलेंच नाही, पण नंतर रशियाच्या पॅरिस येथील वकिलानें त्याला एकदम पन्नास हजार पौंड दिले, म्हणजे ५० वर्षांचें वर्षासन आगाऊ देऊन टाकलें. या वेळीं त्याचें वय ५४ वर्षांचें होतें.

या औदार्याबद्दल कृतज्ञता दाखवण्याकरता तो १७७३ सालीं रशियांत जाऊन तेथे सहा महिने राहिला, आणि रशियांतील शिक्षणव्यवस्था अशा तऱ्हेने आंखून दिली की त्यांत प्राथमिक शिक्षण सक्तीचें व फुकट असून त्यांत धर्माचा संबंध नसवा. शाळेंत विद्यार्थ्यांना पुस्तकें व अन्नही फुकट मिळावें अशी त्याची योजना होती. नंतर हॉलंदमधे बरेच दिवस राहून तो परत पॅरिसला आला, आणि नंतर दहा वर्षांनीं ( १७८४ साली ) मेला. मरणाच्या आदल्या दिवशीं सायंकाळीं आपल्या मित्रांना बोलावून त्याने सांगितलें की तत्वज्ञानाची पहिली पायरी म्हणजे अविश्वास. तो मरणार हें माहीत असल्यामुळे दुसऱ्या दिवशीं एक धर्मोपदेशक त्याजकडे गेला असतां त्याने त्याचा सत्कार केला. परंतु पापांची कबुली देऊन पश्चात्ताप झाल्यास मुक्ति मिळते असें तो सांगू लागला तेव्हा 'यावर

माझा विश्वास नसतां मी असें खोटें काम काय म्हणून करूं ?' असें विचारलें.

दीदरोची बायको धार्मिक होती आणि तिचा यावर पूर्ण विश्वास होता आणि नवरा धार्मिक झाल्यास तिला आनंद झाला असता. तरीही खोटें काम करण्याचा सल्ला तिने नवऱ्याला दिला नाही आणि तो धर्मोपदेशक निघून जाई-पर्यंत, त्याने कांही त्रास देऊं नये म्हणून, बायको व मुलगी दोघीही तेथे बसून राहिल्या. विज्ञान हाच त्याचा धर्म जन्मभर होता, तसाच तो मरतेवेळींही राहिला आणि त्याने बिलकूल माघार घेतली नाही. त्याची इतकी कीर्ति झाली होती, आणि इतके लोक त्याला ओळखांत होते, तरीही त्याचा प्रेतविधि अत्यंत साधा झाला. मेल्यानंतर केलेलीं भाषणें किंवा देवळांत वाजवलेल्या घंटा मृताला ऐकूं येत नाहीत असें तो म्हणत असे.

दीदरोची बुद्धि तर असामान्य होतीच, पण तितकाच त्याचा स्वभावही उदार होता. कोणालाही नाही म्हणायचें त्याच्या जिवावर येत असे. तो लोकांच्या पुस्तकांना फुकट प्रस्तावना लिहीत असे, भाषणें लिहून देत असे आणि निरक्षर लोकांना पत्रेंही लिहून देत असे. एकदा त्याने एकाला केशवर्धक तेलाची जाहिरात लिहून दिली. एकदा त्याने ज्यावर बरेच उपकार केले होते असा एक तरुण त्याच्याकडे एक हस्तलिखित घेऊन आला आणि त्या लेखाला टीपा लिहि-ण्याची विनंति केली. दीदरो पहातो तों त्यांत त्याला स्वतःलाच खूप शिव्या दिल्या होत्या आणि चेष्टा केली होती. तूं माझ्याविरुद्ध कां लिहितोस, असें दीदरोने विचारतां तो म्हणाला, मला पैशाची जरूर आहे आहे आणि असा लेख छापूं नये म्हणून तुम्ही मला पैसे द्याल असें मला वाटलें. दीदरो म्हणाला, ही कल्पना चुकीची आहे, पण हा लेख 'ड्यूक ऑफ् ऑर्लीन्स्' कडे घेऊन जा, तो धार्मिक आहे आणि मी नास्तिक असल्यामुळे तो माझा द्वेष करतो. हा लेख त्याला अर्पण कर; म्हणजे तो तुला खूप पैसे देईल. 'पण माझी आणि ड्यूकची ओळख नाही आणि अर्पणपत्रिका तरी कशी लिहावी ?' 'अंः, त्यांत काय आहे ? बस येथे आणि मी सांगतों तसें लिही.' अर्पणपत्रिका लिहून झाल्यावर तो

तरुण ड्यूककडे गेला आणि भरपूर पैसे मिळवून दीदरोचे आभार मानण्याकरता परत आला.

आणखी एक गोष्ट. एका बड्या ड्यूकने एका रखेलीला टाकली होती आणि तिने सगळे दागिने वगैरे विकून खाल्ल्यावर तिची अन्नान्न दशा झाली. तिने ड्यूकला पत्र लिहिलें पण उपयोग झाला नाही, तेव्हां ती दीदरोकडे आली. त्याने तिला एक पत्र तयार करून दिलें, त्यांत असें लिहिलें की आता मजजवळ फक्त तुमची तसबीरच काय ती शिल्लक राहिलेली आहे, आणि पोटाकरता तीही विकण्याचा प्रसंग माझ्यावर आलेला आहे. तिला ताबडतोब मदत मिळाली. पुढे एकदा त्याच्याच सल्ल्यावरून तिने डयूकला असें पत्र लिहिलें की तुम्ही मला मदत न केल्यास मी एखाद्या इस्पितळांत जाऊन तुमचीं पत्रें हातांत घेऊन मरेन आणि तेथून तीं तुमच्याकडे परत येतील. याचाही ताबडतोब उपयोग झाला.

यावरून सुस्वभावाला धर्माची गरज नसते. नास्तिक मनुष्य देखील, परलोकांतल्या बक्षिसाची आशा नसतांही, परोपकारी असूं शकतो. पण दीदरो देखील एकदम नास्तिक झाला नाहीं. त्याचें शिक्षण धार्मिक संस्थांत झालें होतें. त्याचा परिणाम एकदम कसा नाहीसा होणार ? परंतु नंतर मात्र त्याची खात्री झाली आणि तो सर्वांस सांगूं लागला की जे लोक ईश्वर मानतात, त्यांच्या नीतीचा पायाच खोटा होतो आणि त्यांची नीति बिघडते. धर्म हा परोपकाराचा पाया नव्हे, आणि एकंदरींत नीतीने वागल्यानेच सुख मिळतें हें कळायला धर्माची जरूर नसते. धर्मामुळें लोकांना भीति वाटून ते अधिक नीतिमान होतील ही कल्पना फोल आहे. असा परिणाम झालेला कोणत्याही देशांत दिसत नाही, रोमन लोकांच्या देवांना नीति मुळीच नव्हती, पण रोमन लोकांना ती होती. धर्माचा नाश केल्यावर त्याच्या जागीं तुम्ही काय ठेवणार, असें लोक म्हणतात. परंतु धर्म म्हणजे एक भयंकर पूर्वग्रह आहे, तेव्हा त्याचा नाश करणेंच योग्य आहे आणि त्याच्या जागीं कांही घालण्याची जरूर नाही, असें तो म्हणत असे. ख्रिस्ती लोकांना मारणें हें मुसलमानांना पुण्य वाटतें आणि ख्रिस्त्यांना याचे उलट

वाटतें. खून, मारामाऱ्या, लढाया या धर्मांमुळें नेहमी होत असतां धर्माचं भयंकरपणा लोकांना कळूं नये हें आश्चर्य आहे. धर्म म्हणजे वेगवेगळ्या राष्ट्रांत समाजांत दुही माजवण्यास कारण होतो हें कोणासही दिसतें.

धर्मापासून कोणताही फायदा नाही आणि नुकसान मात्र आहे. कांहि म्हणतात, धर्मानें आम्हास स्वर्गाची आशा मिळते, ती नाहीशी केल्याचा काय फायदा ? दीदरो म्हणतो, आपल्याला डोळे नसतां दिसेल, कान नसतां ऐकूं येईल डोकें नसतां विचार करतां येईल, हृदय नसतां प्रेम करतां येईल, ज्ञानतंतु नसत ज्ञान होईल, आणि आपण कोठेही नसतां आपल्याला अस्तित्व असेल, असें मानणें समंजस नाही. ( अपूर्ण )

---

# वनविहार

'गी द मोपँसां' वरून

मेयरसाहेब न्याहारीला बसण्याच्या बेतांत होते, इतक्यांत बातमी आली की गांवांतल्या एका पोलिसच्या शिपायाने दोन कैदी आणले आहेत. ते ऑफिसांत जाऊन पहातात तों शिपाई मध्यम वर्गांतील एका पोक्त व गंभीर जोडप्यावर पहारा करीत उभा होता. तीं दोघेंही लठ्ठ असून पुरुषाचे केस पिकलेले, नाक लाल आणि चेहरा उतरलेला होता, आणि स्त्री मात्र शिपायाकडे धिटाईने पहात होती.

'काय रे, काय आहे ?' मेयरने विचारलें.

'मी आज सकाळीं नेहमीप्रमाणे रखवालीवर गेलों होतों, तेव्हां एक शेतकऱ्याचा पोर म्हणाला, पलीकडच्या रानांत जाऊन पहा, तिकडे आतांच एक म्हातारें जोडपें गेलें आहे. कांहींतरी गंमत दिसेल. दोघांमिळून १३० वर्षें तरी वय असेल त्यांचें. मी तिकडे गेलों तों मधून मधून कुजबुजलेलें आणि मधून थापा ऐकूं आल्या. तेव्हा येथे कांहीतरी अनन्वित प्रकार होत असला पाहिजे, असें वाटून मी दबा धरून हातांपायांवर रांगत गेलों आणि अगदी ऐन वेळेवर

जवळ जाऊन हीं दोघ आपल्या नैसर्गिक वासनेला बळी पडणार होतीं इतक्यांत मीं त्यांना पकडून आणलें.'

मेयरने मोठ्या आश्चर्याने त्या दोघांकडे पाहिलें. पुरुषाचें वय निदान ६० आणि बाईचें निदान ५५ दिसत होतें. त्याने प्रथम पुरुषास प्रश्न केले. त्याने इतक्या खालच्या आवाजांत उत्तरें दिलीं की तीं जेमतेमच ऐकूं येत होतीं. 'तुझें नांव काय?' 'निकोलास बोरॅं' 'धंदा?' 'माझें पॅरिसला दुकान आहे.' 'या रानांत काय करीत होतास?' तो आपल्या लठ्ठ पोटाकडे दृष्टी लावून गप्प राहिला, तेव्हा मेयर पुढें म्हणाला, 'हा शिपाई म्हणतो तें तूं नाकबूल करतोस काय?' 'नाही, साहेब.' 'तरमग तें तुला कबूल आहे?' 'होय साहेब.' 'मग तुझी काय कैफियत आहे?' 'कांही नाही साहेब.' 'ही बाई तुला कोठे भेटली?' 'ती माझी बायको आहे, साहेब.' 'तुझी बायको?' 'होय साहेब.' 'मग तुम्ही पॅरिसला एकत्र रहात नाही वाटतें?' 'एकत्रच रहातों, साहेब.' 'मग तुम्ही अशा स्थितींत सकाळीं दहा वाजतां रानांत सांपडतां, तेव्हा तुम्हाला वेड लागलें असलें पाहिजे!' बोरॅं रडण्याच्या बेतांत आला होता, तो म्हणाला, 'हिने मला फूस लावली. तरी मी तिला सांगत होतों की हा मूर्खपणा आहे म्हणून. पण एखाद्या बाईच्या डोक्यांत एखादी गोष्ट एकदा आली की ती तेथून बाहेर निघणें कठिण.' 'पण तिच्याच एकटीच्या डोक्यांत आली असती तर तुम्ही दोघें सांपडलां नसतां.' तेव्हा बोरॅं चिडून बायकोकडे वळून म्हणाला, 'पाहिलेंस? तुला एकदम काव्य आठवल्यामुळे आपल्यावर काय संकट आलें आहे तें? आता या वयांत आपल्याला नीतिभंगाबद्दल कोर्टांत जावें लागणार, आणि मग दुकान विकून टाकून कोठेतरी निघून जावें लागेल. काय नशीब आहे!'

आता मात्र बायको उठली आणि बिलकुल न लाजतां किंवा डगमगतां म्हणाली, "साहेब, आमच्यावर लाजण्याचा प्रसंग आला आहे हें खरें, पण मला थोडीशी वकिली करूं द्याल का? मी कांही वकील नाही, पण आमच्यावर खटला न करतां परत घरीं जाऊं द्याल तर मेहेरबानी होईल. आमचें लग्न होण्यापूर्वी आम्ही

दोघेही पलीकडल्या गांवांत वेगवेगळ्या दुकानांत नोकर होतों. या गांवात रोझ नांवाची माझी एक मैत्रीण रहात असे, तिच्याकडे मीं कधीकधीं रविवारी रहायला येत असें. तिचा एक प्रेमी होता आणि मला कोणीच नव्हतें. तो आम्हाला या रानांत घेऊन येत असे आणि तो एकदा म्हणाला ' पुढच्या वेळीं एका मित्राला बरोबर आणीन हां '. मी त्याला सांगितलें की त्याचा कांहीं उपयोग नाही, कारण मी सद्‌गुणी होतें. पुढच्या वेळेला बोरॅ स्टेशनावरच भेटला. त्यावेळीं तो देखणा होता, पण मी मनांत निश्चय केला की आपण कांहीं केल्या कबूल व्हायचें नाहीं आणि मी नाहीच कबूल झालें. हवा फारच चांगली होती आणि फुलें वगैरेनीं वातावरण इतकें उत्तेजक झालें होतें की त्याचा परिणाम दारू प्यालासारखा होत होता. रोझ व सायमन् यांनीं चुंबनालिंगनाचा सपाटा लावला होता आणि मला तें पहावें लागत होतें. बोरॅ व मी ओळख नसल्यामुळें धड बोलतही नव्हतों. तो बोलायला भीत होता आणि हें पाहून मला बरेंच वाटत होतें; आम्ही रानांत जाऊन चौघेही खाली बसलों. मी फार गंभीर होतें याबद्दल रोझ माझी चेष्टा करीत होतीं, पण गंभीर झाल्याशिवाय मला गत्यंतर नव्हतें. रोझ व सायमन् तर अशीं वागत होतीं की जणूं काय तेथें दुसरें कोणी नव्हतेंच. नंतर ती एकमेकांत कांहींतरी कुजबुजलीं आणि तेथून उठून कांहीं झुडपांच्या आड गेलीं. मी अनोळखी तरुणाबरोबर एकटीच राहिल्यावर मला काय वाटलें असेल याची आपणच कल्पना करा. पण धीर धरून मी त्याच्याजवळ बोलूं लागलें. हें पाहून त्यालाही थोडा धीर चेपून तो अधिक सलगी करूं लागला. पण मीं तें कांहीं चालूं दिलें नाही. कां, खरं की नाही ? " ती नवऱ्याकडे पाहून म्हणाली, पण तो आपल्या पायांकडे पहात होता. ती पुढे म्हणाली, " मी ऐकत नाहीं असें पाहून माझ्या सद्वर्तनाबद्दल त्याची खात्री झाली आणि नंतर तो विवाहाच्या दृष्टीने राजरोस प्रियाराधन करूं लागला आणि थोड्याच महिन्यांत आमचें लग्न झालें आणि आम्ही पॅरिसला दुकान काढलें.

" कांही वर्षें आमचे हाल झाले आणि पॅरिसहून बाहेर जायला आम्हाला सवड झाली नाही आणि मग पॅरिसची संवय झाली. व्यापारांत प्रेमापेक्षा

पैशाकडेच जास्त दृष्टि असते. आमचें वय नकळत वाढत होतें आणि कामुक प्रेम मावळत चाललें. त्याचा फायदा आपण न घेतल्यामुळे आपलें नुकसान झालें असें ज्याला वाटेल त्याचेंच नुकसान. ज्याला वाटलें नाही त्याचें नुकसान कसलें ? पण मग दुकानाची भरभराट झाली आणि आम्ही भवितव्याबद्दल निश्चित झालों, आणि मनाला मोकळेपणा मिळाल्यामुळे मला पुनः प्रेमाची आठवण झाली आणि एखाद्या विद्यार्थिनीसारखीं मला स्वप्नें पडूं लागलीं. मला वाटूं लागलें की गेल्या वीस वर्षांत इतर स्त्रियांप्रमाणें वनांतील चुंबनसौख्य आपल्याला मिळालें नाही आणि आपलें आयुष्य फुकट गेलें. पाण्यावर चांदणें पडलेलें पाहिलें की मला त्याच पाण्यांत जीव द्यावासा वाटत असे. पण मी बोरँजवळ कांही बोललें नाही, कारण बोललें तर तो चेष्टा करणार आणि दुकानाचें काम पहा म्हणून सांगणार. खरें म्हटलें तर तो कधी माझ्याशीं फारसा बोलतच नसे आणि मीं आरशांत पाहिलें तेव्हा मला हेंही समजलें की आता कोण माझ्याकडे पहाणार ?

"पण शेवटीं मीं एकदा निश्चय केला आणि बोरँला म्हटलें कीं आपली प्रथम ओळख झाली त्या जाग्यावर एकदां जाऊं. त्याच्याही मनांत कांही किंतु न येतां तो निघाला आणि आज सकाळीं ९ वाजतां आम्ही येथे पोंचलों. मला एकदम तारुण्य पुनः आल्यासारखें वाटूं लागलें आणि बोरँही मला पूर्वीसारखा देखणा दिसूं लागला. आणि खरें सांगायचें म्हणजे तो एक प्रकारचा उन्मादच होता. मीं त्याचें चुंबन घेतलें तेव्हा तो इतका दचकला की जणूं काय मीं त्याचा खूनच करायला निघालें आहें. तो म्हणाला 'तुला वेडबिड लागलें आहे, की काय झालें आहे काय तुला ?' पण मी त्याचें बिलकूल न ऐकतां त्याला आपल्या बरोबर रानांत जायला लावलें. ही खरी हकीकत आहे."

मेयर समंजस मनुष्य होता. तो हंसत खुर्चीवरून उठला आणि म्हणाला, 'बाई तुम्ही खुशाल घरीं जा, पण पुनः असा मूर्खपणा करूं नका, निदान झाडाखालीं.'

---

# सौंदर्याचा तपशील-३

*X०X*

( ल्यूडोव्हीची यांचे पुस्तकावरून )

यूरोपांत प्रचलित असलेल्या सौंदर्याच्या कल्पना बहुतांशीं ग्रीक लोकां-वरून घेतलेल्या आहेत आणि ग्रीक लोकांच्या एका विशिष्ट दोषामुळे या कल्पना कांहीं बाबतींत चुकलेल्या आहेत. प्राचीन काळीं ग्रीक लोकांची संस्कृति अत्यंत उच्च दर्जाची होती हें निर्विवाद आहे, तरीदेखील एका प्रमुख दोषामुळे त्यांची सौंदर्याची कल्पना विकृत झालेली होती. तो दोष हा की ग्रीक लोक समसंभोगी किंवा समप्रेमी होते. इतकेंच नव्हे तर त्यांना हा दोषच वाटत नसल्यामुळे तो लपव-ण्याचाही ते प्रयत्न करीत नसत. अलीकडील लेखक मात्र या गोष्टीवर शक्य तितकें पांघरूण घालण्याचा प्रयत्न करतात, कारण ख्रिस्ती धर्मातील बऱ्याच कल्पना ग्रीक तत्वज्ञानांतून उसन्या घेतलेल्या आहेत, तेव्हा ख्रिस्ती संस्कृतीचा उगम दूषित होता असें कसें कबूल करावें ? तथापि ही सहज लपवतां येण्यासारखी गोष्ट नाही. ही प्रवृत्ति फार जुनी असल्याबद्दल प्लेटोने लिहिलें आहे आणि ती फक्त नीच किंवा बदफैली लोकांतच होती असें नाही, तर अत्यंत उच्च दर्जाचे लोक देखील या पंथांत होते, उदाहरणार्थ सॉफोक्लीस्, सॉक्रेटिस, प्लेटो, डेमॉस्थेनीस्. ती एक सर्वमान्य गोष्ट होती आणि त्याची कोणाला लाज वाटत नसे इतकेंच नव्हे तर त्या वेळीं पुरुषांचीं वेश्यागृहें देखील असत, आणि सरकार त्यांचेकडून कर घेत असे सोलन् नांवाचा जो प्रसिद्ध कायदेकार होऊन गेला तो यापैकीच होता आणि त्याच्या एका कायद्याने गुलामांना अत्तरें वापरण्याची व समसंभोगाची परवानगी नाही असें जाहीर केलें. म्हणजे खालच्या दर्जाच्या लोकांकडून हा हक्क काढून घेतल्यामुळे ही चाल अधिक सन्मान्य केली. उच्च दर्जाच्या लेख-कांनी व कवींनी अशा प्रकारच्या प्रेमासंबंधी कविता रचल्या आहेत आणि प्लेटोच्या लिखाणांत देखील याला स्थान आहे. प्रेम करण्यास योग्य तरुणी

नसून तरुण मुलगेच होत अशी त्यावेळीं ग्रीसमध्ये सर्वमान्य कल्पना होती. अर्थात् ग्रीक लोकांचे विवाह हल्लीप्रमाणे स्त्रियांशींच होत असत, परंतु त्या प्रेमास पात्र नव्हत्या. पुढें ग्रीस देशांत सुशिक्षित गणिकावर्ग तयार झाल्यावर ही स्थिति थोडीबहुत बदलली आणि त्याही प्रेमाच्या वांटेकरी झाल्या. ग्रीक संस्कृतीची ही महत्वाची बाजू झांकून टाकण्याचा प्रयत्न इतक्या कसोशीने झालेला आहे की विशेष प्रयत्न केल्याशिवाय ही गोष्ट सामान्य विद्यार्थ्यांच्या लक्षांत येत नाही. पुष्कळशा जर्मन व इंग्लिश लेखकांनी याचा उल्लेखच केलेला नाही व कांहींनी ही चुकून एखादे वेळीं होणारी गोष्ट भासावी अशा तऱ्हेने उल्लेख केला आहे. कांहींनी दोष कबूल करून सबबी सांगण्याचा प्रयत्न केला आहे. रोमन लोकांतही ही चाल सुरू झाली, पण या दोहोंत एक मोठा फरक होता. तो हा की ग्रीक तरुण मोठ्या लोकांजवळ अशा तऱ्हेने राहून आपली मानसिक उन्नति व शिक्षण करून घेत असत आणि रोमन लोकांत हा एक शौक होता. या प्रेमांत बराच उच्च मानसिक भाग असे, असें कबूल करून देखील सि मं ड स् म्हणतो की ही चाल ग्रीक लोकांच्या अवनतीच्या काळांतील होय. पण हें खरें नाही, कारण होमरच्या लिखाणांत देखील याचे पुरावे सांपडतात.

येथे आपणास इतकेंच लक्षांत घेणें जरूर आहे की या अनैसर्गिक प्रेमाचा परिणाम ग्रीकांच्या सौंदर्याच्या कल्पनेवर अनिष्ट झाला, आणि तो आजपर्यंत शिल्लक आहे, कारण ख्रिस्ती राष्ट्रांनीं आपल्या बऱ्याच कल्पना ग्रीकांकडून उसन्या घेतलेल्या आहेत. शिल्पकार पुरुष असल्यामुळे आणि पुरुषांनाच त्यांनीं प्रेमपात्र मानल्यामुळे त्यांनी स्त्रियांचे पुतळे देखील थोडेबहुत पुरुषी वळणावर केले आणि स्त्रियांचें विशिष्ट सौंदर्य त्यामुळे लोपलें. उदाहरणार्थ पाय व बाकीचें शरीर यांचें प्रमाण स्त्रियांत व पुरुषांत वेगवेगळें असतें हें न समजून, शोपेनहोअर, गटे वगैरे सारख्या अग्रगण्य लेखकांनी देखील पुरुषाचें शरीर स्त्रीच्या शरीरापेक्षां अधिक सुंदर असतें, असें वेडगळ विधान केलें आहे. स्त्रीचें शरीर वेगळ्या प्रकारचें असतें, त्याला पुरुषाचींच मापकाठी कशी लावतां येईल ? स्त्रीचें सौंदर्य दाखवायचें असेल तर तिच्या विशिष्ट शरीररचनेवरच भर दिला पाहिजे आणि तो ग्रीकांच्या अगो

दरच्या चित्रकारांनी व शिल्पकारांनी दिलाच आहे, असें इजिप्त किंवा हिंदुस्थानां-तील चित्रें पाहिल्यास दिसेल. इतकेंच नव्हे तर गेल्या शतकांतील कांही फ्रेंच कारागिरांनीही तेंच केलें आहे. ग्रीकांच्या बिघडलेल्या अभिरुचीचा आणखीही एक पुरावा आहे. तो हा की ग्रीकांचे वेळचे बहुतेक नग्न पुतळे पुरुषांचे आहेत. जेथ त्यांनी स्त्रियांचे पुतळे केले, तेथेही त्यांनी पुरुषी घाटाचें शरीर केलें, म्हणजे स्त्रियांचे पाय धडापेक्षा आंखूड असायचे तसे न दाखवतां फाजील लांब दाखवले आहेत. पुरुषांचे उंचीचे दोन सारखे भाग केल्यास ते जघनास्थीशीं (जननेंद्रियाचे वरचें हाड ) पडतात. पण स्त्रीचे मात्र पाय लहान असल्यामुळे या हाडाचे किंचित् वर मध्यबिंदु येतो. याचें एक कारण असें आहे की स्त्रीची वाढ पुरुषाचे मानाने लवकर खुंटते. बीजकोशांची क्रिया स्त्रीमधे लवकर सुरू होते आणि ही एकदा सुरू झाली म्हणजे अवयवांची लांबी वाढत नाही. तेव्हा ही लांबी फाजील वाढल्यास तीवरुन मंदकामतेचें अनुमान निघतें.

× × × ×

स्त्रीपुरुषांच्या पोषाखांत बऱ्याच विचार करण्यासारख्या गोष्टी सांपडतील. एकतर जेथे स्त्रीपुरुषांचे पोषाख वेगवेगळ्या प्रकारचे असतात, तेथे पोषाखावरून लिंग ओळखण्याची आळशी पद्धत पडते, आणि स्त्रीपुरुषांमधील शारीरिक फरकां-वरून लिंग ओळखण्याची खटपट कोणी करीत नाही. स्त्रीपुरुषांचे कपडे सारखेच असल्यास अर्थातच लिंग ओळखण्यास कपड्याचा उपयोग होणार नाहीं, आणि शरीराच्या आकारावरूनच तें ओळखावें लागेल. हा फरक ज्यांच्या शरीरांत पुरेशा प्रमाणांत दिसेल, त्यांच्याकडेच लोकांचें लक्ष जाईल, इतरांकडे जाणार नाहीं. हलीचा तरुण कोणत्याही स्त्रीविशिष्ट पोषाख केलेल्या व्यक्तीकडे आकर्षिला जातो आणि या उलट स्त्रियांची स्थिति होते. हें आकर्षण अर्थातच खोटें असतें. पोषाख सारखा असल्यास त्यांतूनही पुरुष किंवा स्त्री ओळखूं येण्यासारखें शरीर म्हण-जेच स्त्रीचें किंवा पुरुषाचें योग्य शरीर; आणि तें नसलेल्यांकडे कोणी ढुंकून पहा-णार नाही. हा सामाजिक दृष्टीने फायदा होईल, कारण सुप्रजानिर्मितीला अशींच

शरीरें पाहिजे असतात, आणि अशांत आकर्षण उत्पन्न झाल्यासच सुप्रजा निर्माण होईल. हल्ली यूरोपांत बऱ्याच स्त्रिया पुरुषी पोषाख करतात आणि त्यांचें शरीर जर स्त्रीला योग्य नसेल तर त्यांना लोक पुरुषच समजतात, कारण पुष्कळ वेळां त्यांचे केंसही पुरुषांसारखेच कापलेले असतात. बायकी पुरुषांनी बायकांसारखा पोषाख केल्यास त्यांचीही तशीच गत होईल, म्हणजे त्यांना कोणी पुरुष समजणारच नाही. आता कोणी असें म्हणेल की पुरुषांनी दाढीमिशा काढून टाकणें म्हणजे थोडाबहुत बायकी पोषाखच नव्हे काय? हें खरें आहे, परंतु स्त्री-पुरुषांचे कपडे वेगवेगळे असल्यामुळें त्याचा परिणाम तसा होत नाही. कपड्यांचा परिणाम विशेषतः लढाईचे दिवसांत दिसला. ज्यांना एरवी कोणी मुळीच विचार-णार नाही असे पुरुष शिपायाचे वेषांत आकर्षक दिसूं लागले आणि स्त्रिया त्यांचे मागे जाऊं लागल्या. किती तरी पुरुषांची स्त्रैणता अशा पोषाखांमुळे झांकून जाते. या दृष्टीने दाढीमिशा काढणें माझे मतें चांगलें आहे. कारण पुरुषाचा चेहरा बायकी असल्यास यामुळे तो तसा स्पष्ट दिसतो आणि अशा चेहऱ्याबद्दल स्त्रियांना आकर्षण वाटणार नाही, किंवा निदान वाटूं नये. हल्लीच्या लिंग-विशिष्ट वेशभूषापद्धतीमुळे अननुभवी माणसें तरी चुकीची निवड करतात, तेव्हा यापुढे स्त्रीपुरुषांचा पेहराव शक्य तितका सारखा करण्याची खटपट केली पाहिजे, म्हणजे स्त्री किंवा पुरुष शारीरिक गुणांवरून ओळखण्याची लोकांना संवय होईल. तेव्हा हल्ली स्त्रियांनी केंस आंखूड ठेवण्याची व इतर बाबतींतही पुरुषांचें अनुकरण करण्याची पद्धत पडत आहे हें चांगलेंच आहे. प्राचीन ग्रीक व रोमन लोकांत स्त्रियांच्या व पुरुषांच्या पोषाखांत फारच थोडा फरक असे, आणि दाढीमिशा काढण्याची पद्धतही बरीच रूढ झाली होती. चीन व जपानमधेही अगदी अली-कडेपर्यंत स्त्रीपुरुषांचे पेहराव सारखेच असत. तेव्हा ही कल्पना अगदीच नवीन नाही. पुरुषांनी हळूहळू स्त्रियांचे पोषाखांतील महत्त्वाचा भाग, म्हणजे झगा आणि सैल सदरा वापरूं लागलें पाहिजे असें माझें मत आहे आणि स्त्रियांनी पुरुषांसारखा पोषाख करूं लागणें ही माझ्या मतें चुकीची दिशा आहे. मला असें म्हणण्याला एक सबळ कारण आहे, तें हें की हल्लीच्या यूरोपीय पोषाखामुळे

पुरुषांचें पौरुष कमी झालें आहे असें माझें मत आहे. प्राचीन ग्रीक, रोमन, इजिप्शियन वगैरे लोकांच्या पोषाखांत बीजकोशांना हवा लागण्याची व्यवस्था असे. हल्ली देखील स्कॉच लोक ' किल्ट् ' ( गुडघ्यापर्यंत झगा ) घालतात आणि जुन्या आयरिश् पुरुषांचा पोषाख असाच असे. दुर्दैवाने यूरोपीय पुरुषांनी उत्तरेकडील थंड प्रदेशांतील लोकांचा पोषाख उचलला आणि स्त्रियांनी मात्र मोकळा पोषाख कायम केला. वास्तविक दोघांत फरकच करणें असेल तर विजारीसारखें बंद वस्त्र स्त्रियांना चाललें असतें, कारण त्यांचे बीजकोशांना हवा लागणें एवीतेवी शक्यच नसतें आणि त्यांचें त्यापासून नुकसान होत नाही. परंतु हल्ली ग्रीक शेतकरी आणि स्कॉच लोक यांशिवाय सर्वांचें विजारीमुळे नुकसान होतें. कोणालाही ही गोष्ट सहज दिसण्यासारखी आहे की सर्व सस्तन प्राण्यांत नराचे बीजकोश मोकळे लोंबत असतात आणि त्यांवर इतर शरीरासारखें केंसांचें आच्छादनही नसतें, यावरून हें स्पष्ट दिसतें की हे भाग पोटापेक्षा थंड रहावे अशी नैसर्गिक योजना आहे. हा केवळ तर्कच नाही तर कांही प्रयोगांवरून असें दिसतें की सशांच्या किंवा उंदरांच्या बीजकोशांस उष्णता लावल्यास त्यांची कामशक्ति कमी होते. विजार घालण्याने बीजकोशांस फाजील उष्णता लागते आणि त्यामुळे अशा प्रकारची हानि होते. यावरून पुरुषांनी किल्टसारखें वस्त्र वापरणें सर्वांत उत्तम ठरतें. आंखूड विजारींत देखील दोष असतोच, कारण बीजकोशांजवळचा भाग गरम रहातो. वस्त्र झग्याचे जातीचें असून तें गुडघ्याइतकें किंवा फारतर पोटरीपर्यंत लांब असावें, म्हणजे हवा मोकळी खेळण्यास वाव राहील.

( यावरून धोतर नेसण्याची पद्धत चांगली असें कांही लोकांस वाटण्याचा संभव आहे, परंतु कासोटा व निऱ्यांचा भारा यांमुळें त्यांत वरील दोष रहातोच व शिवाय तें गैरसोयीचें असतें. बायकांना जसा मधूनमधून पदर सांवरावा लागतो त्याचप्रमाणें चालतांना धोतराची मधून मधून दुरुस्ती करावी लागते. उद्योगी माणसांना यापेक्षा सुटसुटीत व वारंवार लक्ष द्यावें न लागेल असा पोषाख पाहिजे, आणि याकरताच बरेच लोक विजार पसंत करतात. धोतर गुडघ्याइतकें आंखूड असून तें कासोट्याशिवाय फक्त वेष्टीसारखें गुंडाळलेलें असल्यास उत्तम

होईल.परंतु ' किल्ट 'सारखें शिवलेलें वस्त्र त्यापेक्षा कदाचित् अधिक सुटसुटीत होईल, व त्याचे वर गंजीफ्राक, खमीस व कोट इतके कपडे घालण्यापेक्षा एका सदऱ्यानेच काम भागवतां येईल. हा किंचित् जाड कापडाचा करावा लागेल व त्याला खिसे वगैरेही करतां येतील. सं.

---

# गांधीजींची घमेंड

अहमदाबादला एक संततिनियमन-संस्था निघाल्याबद्दल ' हरिजन ' च्या एका अंकांत गांधीजींनी खेद प्रदर्शित केला आहे. त्याचबरोबर त्यांनी असेंही म्हटलें आहे की ज्यांनी ब्रह्मचर्य पाळलें आहे त्यांनाच तरुणांना या बाबतींत शिक्षण देण्याचा अधिकार आहे. अर्थात् गांधीजी स्वतःला ब्रह्मचर्य पाळणारे समजत असल्यामुळे त्यांना स्वतःला हा अधिकार आहे अशी त्यांची कल्पना आहे. पण ही पोकळ घमेंड आहे हें त्यांचें स्वतःचें आत्मवृत्त वाचणारांस सहज दिसतें. गांधीजींनी तारुण्यांत ब्रह्मचर्य बिलकुल पाळलें नाही. तेराव्या वर्षापासून ३९ व्या वर्षापर्यंत विवाहसुख भोगून नंतर ब्रह्मचर्य पाळणाऱ्या मनुष्याला **फारतर** चाळिसाव्या वर्षापासून पुढे ब्रह्मचर्य पाळा असें सांगण्याचा हक्क पोंचेल. तरुणांना ब्रह्मचर्य पाळण्यास सांगण्याचा त्यांना काय हक्क आहे ? आणि ४० वर्षांचे पुढे ब्रह्मचर्य पाळण्याचा संततिनियमनाचे दृष्टीने बिलकुल उपयोग नाही, कारण तेथपर्यंत दहापंधरा मुलें देखील होतील. तर्कशास्त्राचें आणि गांधीजींचें वांकडें असल्यामुळेच ते असा उपदेश करतात आणि म्हणूनच उपदेशाचा हक्क आपल्यालाच आहे अशी बढाई मारतात.

परंतु वस्तुतः २१–२२ वर्षांपर्यंत देखील जे तरुण ब्रह्मचर्य पाळतात त्यांचाही मनोनिग्रह गांधीजींपेक्षां जास्त आहे, कारण तो तारुण्यांत केलेला असतो. मात्र ब्रह्मचर्याचे दुष्परिणाम स्वतःच्या व इतरांच्या अनुभवावरून आम्हास माहीत झाल्यामुळे आम्हास या विषयाचा अभ्यास करण्याची बुद्धि झाली व ज्ञान

मिळालें व म्हणूनच आम्ही तरुणांना ब्रह्मचर्याचा उपदेश करीत नाही. परंतु गांधीजींनी तारुण्यांत ब्रह्मचर्य पाळलें नसल्यामुळे तरुणांच्या ब्रह्मचर्यासंबंधी मत देण्याचा हक्क त्यांचेपेक्षा आम्हासच जास्त पोंचतो. शिवाय आम्हास हेंही समजतें की सर्व माणसें एका सांच्यांत ओतलेलीं नसतात, यामुळे एकास ब्रह्मचर्य परवडेल तर दुसऱ्यास परवडणार नाही. गांधीजींना याची फिकीर नाही, कारण त्यांचें यांत नफानुकसान कांहीच नाही. पण तरुणांनी संततिनियमनाकरता ब्रह्मचर्यावर अवलंबून रहाणें म्हणजे शुद्ध वेडगळपणा आहे. पूर्वी गांधीजींसारख्याच वेडगळ कल्पना आमच्या डोक्यांत लहानपणींच लोकांनी भरवून दिल्यामुळे आम्हासही ब्रह्मचर्याचें महत्व वाटत असे, परंतु अभ्यास केल्यावर तें खोटें ठरलें. आणि ब्रह्मचर्य कुचकामाचें आहे असें माहीत असूनही त्याचें बंड माजवण्यांत कांही फायदा आहे असें डॉ. लेल्यांस वाटतें, तसें आम्हास वाटत नाही.

**गांधीजींचें रामराज्य.** फैजपूरला भाषण करतांना गांधीजी म्हणाले की हिंदुस्थानावर रामराज्य स्थापन होणार आहे, आणि याचा अर्थ भंगी व ब्राह्मण यांत फरक रहाणार नाही. शूद्राने तपश्चर्या केल्याबद्दल रामाने त्याचें डोकें उडवलें हें माहीत असतांही गांधीजी असें म्हणतात. तर मग बाहेरख्यालीलाच ब्रह्मचर्य कां म्हणूं नये ?

---

# पत्रव्यवहार

१.

मागील अंकांतील पत्राचा उत्तरभाग म्हणून पुढील मजकूर छापण्याची मेहेरबानी व्हावी. 'समाजस्वास्थ्या'च्या पहिल्या वर्षाचा पहिला अंक हातीं पडतांच मी आपली मुद्दाम भेट घेऊन आपलें अभिनंदन केलें व तेव्हांपासून प्रत्येक अंक बारकाईने पहात आहें. त्यांतच भर म्हणजे गेल्या ३५ वर्षांपासून आपल्या कुटुंबांतील माणसांचा व माझा परिचय आहे आणि गेल्या १० वर्षांत तुमच्या व माझ्या ज्या अनेक भेटी झाल्या त्यांवरून तुमची तत्वनिष्ठा, प्रेमळ वृत्ति व

शुद्ध अंतःकरण पाहून मला तुमच्याबद्दल अत्यंत अभिमान व आदर वाटतो. या शिवाय ' स्वास्थ्यां'त छापल्या जाणाऱ्या अनेक पत्रांना जीं तुमचीं बिनचुक (?) व हजरजबाबी उत्तरें येतात, त्यांवरून तुमची असामान्य बुद्धिमत्ताही व्यक्त होते. अशा मनुष्याचे मेंदूमधून कामविषयक मराठी मासिक चालवावें व या विषयाचें महत्व व माहिती लोकांना पटवून देऊन फाजील संततीला प्रतिबंधक उपायही सुचवावेत, इतकेंच नव्हे तर बाहेरख्याली ( गुप्तरोग ) पासून बचावही कसा करून घ्यावा इ. माहितीलाच वाहिलेलें आपलें मासिक असलें, तरी त्याची अत्यंत जरूरी आहे असें मलाही वाटतें. यामुळे ' स्वास्थ्या'वर केव्हांही संकट आलें तरी तें माझ्या स्वतःवर आल्याप्रमाणे मला अंशतः वाटतें. हें सर्व खरें असलें तरी तरुण मुलांची वृत्ति उच्छृंखल असल्यामुळें विवेकाऐवजी तीं सहज भावनावश होतात, हा मानसशास्त्रांतील सिद्धांत तुम्हाला माहीत असावयास पाहिजे. मुलें चोरून तुमचें मासिक वाचतात व त्यामधील सत्यकथांच्या ज्ञानाने तीं खरोखरच दुर्मार्गाला लागतात हें तुम्हाला पटूं नये याचें आश्चर्य वाटतें. सामान्य मनुष्याला व विशेषतः मुलांना सांगावें तें खरें वाटतें व त्याप्रमाणे त्यांची मनोरचनाही बनत जाते. आणि या दृष्टीने ( खोटें असूनही ) ब्रम्हचर्याला फाजील महत्व दिल्यामुळे पूर्वीची पिढी कामविषयासंबंधाने खरोखर उच्छृंखल नव्हती असें माझें स्पष्ट मत आहे. कोल्हापूरचे रा. बागल यांच्या गोष्टी, फ्रेंच भाषांतरित (अ) सत्यकथा, आणि विविध प्रकारचा पत्रव्यवहार वाचणारीं सर्व मुलें व मुली ' स्वास्थ्या'च्या वाचनाने बारगळत चाललीं आहेत असेंही माझें स्पष्ट मत आहे. हें खरें की खोटें याचें उत्तर पुढील काळ दर्शवील. तूर्त ' स्वास्थ्या'च्या सान्निध्याने श्री.... यांची काय स्थिती झाली आहे हें मीं मागील पत्रांत लिहिलेंच आहे. अशीं जीं अनेक मुलें असतील त्यांच्याविषयीं तुम्ही आपलें मत अवश्य छापावें. यावरून स्वास्थ्याची आवश्यकता आहे, परंतु प्रस्तुतच्या पद्धतीची नाही हें माझें स्वतःचें व अनेक सभांतून व्यक्त होत असलेलें लोकमत मी आपणाला कळवलें आहे. कदाचित् आम्ही सर्व कामदेवापासून बारगळलेले असूं.

डिसेंबरच्या अंकांत तुम्ही माझ्या पत्राला छापलेलें उत्तर वाचून मौज

वाटली, कारण खऱ्याखोट्याची भेसळ करून ती आपल्या सोयीप्रमाणें वाचकांपुढें मांडली म्हणजे तेवढ्यापुरती कां होईना, आपली बाजू खरी झाल्याप्रमाणे होते. हेंच मी जादूच्या खेळांत शिकवीत असतों. कदाचित् तसा प्रकार आपणां उभयतांच्या विचारसरणींत झालेला असेल, असो. तुमच्या उत्तरासंबंधाने इतकेंच म्हणतां येईल की मजकूर वाचला, परंतु मतें सर्वस्वी मान्य नाहीत. आता हें प्रकरण येथेंच संपवूं आपला **डॉ. के. भा. लेले.**

उ मुलांनी अमुक वाचूं नये की वाचावें, यासंबंधी आमचा मतभेद आहे व कांही जगन्मान्य विद्वानांचें मत आपल्या विरुद्ध आहे हें आपणांस याच अंकांतील एका लेखावरून दिसेल. आपण केलेल्या स्तुतीबद्दल मी आभारी आहें, परंतु कोणाकरताही मतें बदलणें मला अशक्य आहे व तें ढोंग होईल. मागील पिढींतील लोक नीतिदृष्ट्या हल्लीच्या पिढीपेक्षा कमी दर्जाचे होते, असें मत जुन्या पिढींतल्याच श्री. ना. गो. चाफेकर यांनी साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षस्थानावरून दिलेलें आहे, व ज्या कांहीं जुन्या पिढींतील लोकांशीं आमचा संबंध आला आहे त्यांच्या बोलण्यावरून आमचेंही असेंच मत आहे. हल्लीच्या पिढींत कांहीं दमच नाही, पूर्वींच्या लोकांना लग्नाच्या बायकोशिवाय एखादें अंगवस्त्र असायचेंच, अशा प्रकारचें दूषण जे लोक हल्लीच्या पिढीला देतात, त्यांची नीति काय वर्णावी ? लोकमत आमचे विरुद्ध आहे हें आम्हांस माहीत असल्यामुळेच हें मासिक काढलें, एरवी त्याची जरूरच नव्हती. आम्ही खऱ्याखोट्याची भेसळ करतों हें सिद्ध केल्याशिवाय तसा आरोप करणें हें शिवी दिल्यासारखें होतें. आमच्या म्हणण्यापैकी अमुक भाग खोटा ( म्हणजे आपल्या मतें खोटा नव्हे, तर शास्त्रीय दृष्ट्या खोटा असून तो तसा माहीत असतांही घातला ) आहे असें सिद्ध करण्यास मी आपणास आव्हान करतों. केवळ आपण म्हणतां म्हणून कोणतीही गोष्ट खोटी ठरत नाही हें लक्षांत ठेवावें. आमचीं मतें आपणास मान्य असलींच पाहिजेत असा आमचा आग्रह कधीच नव्हता. परंतु शास्त्रीय दृष्ट्या पुढारलेल्या लेखकांचीं मतें आमच्या मतांशी जुळतात हें खरें, व तीं न जुळतीं तरीहीं आमच्या मतांचा

आम्हाला अधिकार आहेच. त्यासंबंधी वाद करण्याला आमची केव्हाही तयारी आहे. **सं.**

२

१. घटकंचुकी म्हणजे काय व कशास म्हणतात? २. समागमवैचित्र्याचे फोटो जवळ असणें गुन्हा आहे काय? जानेवारी १९३६ चे अंकांत पान २१६ वर अशीं चित्रें विकण्यास कायद्याची आडकाठी आहे, असें आपण लिहितां तरी सदरहू फोटो मिळण्याची जाहिरात आपले मासिकांत व इतर वर्तमानपत्रांतही आहे, तरी सदरहू जाहिरातीवरून फोटो मागवून जवळ असले व कदाचित् मुंबईहून बाहेरगांवीं जातेवेळीं स्टेशनवर तपासतां ते पोलीसने घेऊन फिर्याद दिली तर काय होईल, याबद्दल खुलासा करणें. ३. आपले मासिकांतील ' शांतारामाचें व्यंग'ही गोष्ट खरी आहे, परंतु आमचे [पहाण्यांत अशा बायका आहेत की वेश्याव्यवसाय करीत असून व त्यांना मुलें पाहिजे असून होत नाहीत, तरी त्याचें कारण काय असावें ? मासिकाची भरभराट व्हावी अशी इच्छा करतों. आपला...

उ. घटकंचुकी याचा अर्थ 'महाराष्ट्र शब्दकोशां'त सांपडत नाही. तथापि आमच्या समजुतीप्रमाणें सांगतों. स्त्रीपुरुषांनीं एकत्र जमून स्त्रियांनीं आपल्या चोळ्या एका घटांत जमा करून, त्या मिसळून, पुरुषांत कांहीं विशिष्ट पद्धतानें व निवड करतां येणार नाहीं अशा रीतीनें वांटून द्यायच्या व ज्या स्त्रीची कचुंकी ज्या पुरुषाच्या वांट्याला येईल तो पुरुष व ती स्त्री सर्व निर्बंध बाजूला ठेवून तात्पुरतीं नवराबायको व्हायचीं, या विशिष्ट धार्मिक पद्धतीला घटकंचुकी म्हणतात. २. असे फोटो जवळ असणें हा गुन्हा नाही पण ते विकणें हा गुन्हा आहे. फोटोची जाहिरात इतर पत्रांत आहे असें पाहूनच आम्हीं घेतली होती, परंतु ती आता बंद झाली आहे. शिवाय ते फोटो प्रत्यक्ष मनुष्यांचे नसून आकृतींचे होते. ३. कांहीं इतर स्त्रियांना मुलें होत नाहीत, तशींच कांहीं वेश्यांनाही होत नाहीत, व एकंदरींत वेश्यांना इतरांचे मानाने मुलें कमी होतात, याचें कारण समागमाची फाजील पुनरावृत्ति अशी समजूत आहे. **सं.**

# ज्ञानावर निर्बंध

——:०:——

मुलांनी अमुक वाचतां नये, मुलींनी अमुक वाचतां नये, तरुणांनी अमुक वाचतां नये, स्त्रियांनी अमुक वाचतां नये, प्रजेने अमुक वाचतां नये, अशा प्रकारचे निर्बंध आईबाप, वृद्ध, पुरुष व राजेराण्या घालीत असतात व या बाबतींत स्वतःलाच जास्त कळतें अशी त्यांची कल्पना असते. परंतु यांत वस्तुतः कोणाचा कोणत्याही प्रकारचा फायदा नसतो असें आमचें मत आहे. हें डॉ. केल्यांसारख्या अनेक लोकांना चमत्कारिक वाटतें, व आमच्या मासिकापासून मुलांचे नुकसान होतें व तीं 'बारगळतात' इतकेंही आम्हाला कळूं नये याबद्दल त्यांना आश्चर्य वाटतें. याकरतां येथे कांही इतर लोकांचीं मतें देतों. अर्थात् ज्याला त्याला आपलें मत बनवण्याचा अधिकार आहेच; पण हा शिक्षणतज्ञांचा विषय आहे, तेव्हा यांत सर्वांच्याच मताला किंमत सारखी नाही हें लक्षांत ठेवावें. डॉ. हॅवलॉक् एलिस् आपल्या लिंगशिक्षणावरील ग्रंथांत म्हणतातः—

"मुलगे व मुली वयांत येण्याच्या सुमाराला त्यांना समागमासंबंधी माहिती देण्याचे जे प्रकार कांही प्राथमिक लोकांत सांपडतात, ते आपल्या दृष्टीने कितीही अश्लील असले तरी त्यांनी शिक्षणाचें काम निःसंशय होतें. अश्लीलतेच्या कल्पनेने हे प्रकार आपण काढून टाकले, पण त्यांमुळें शिक्षणही बंद झालें. या शिक्षणाचे शारीरिक व बौद्धिक असे दोन भाग केले तर त्यांपैकी बौद्धिक भाग हल्ली बऱ्याच अंशीं वाचनानेच होतो आणि केवळ लिंगशिक्षणाकरता लिहिलेल्या पुस्तकांपेक्षा तो इतर वाङ्मयानेच जास्त प्रमाणांत होतो. वाङ्मयाच्या बऱ्याच भागांत कामवासना प्रच्छन्न स्वरूपांत असते आणि काल्पित वाङ्मय तर कामप्रवृत्तीवरच आधारलेलें असतें. प्रत्यक्ष समागमापूर्वी तरुणांना कल्पनेनेंच त्याचा अनुभव येतो. यासंबंधी मेच्निकॉफ् ने म्हटलें आहे की काव्याचा व कामवासनेचा निकट संबंध आहे आणि कलेच्या मुळाशींही कामवासना आहे हें अनेकांनी कबूल केलेलें आहे. यामुळे एकंदर वाङ्मय म्हणजे लिंगशिक्षणाचें एक साधनच आहे. सर्व उच्च प्रकारच्या वाङ्मयांत कामवासनेंतील मुख्य गोष्टींचा संबंध असतो आणि हल्लीच्या फाजील सोंवळ्या जगांत ही एक समाधानाची गोष्ट आहे की हें उच्च

वाङ्मय तरुणांपासून लपवून ठेवतां येत नाहीं. उदाहरणार्थ बायबल व शेकस्पिअर यांचें वाङ्मयांतील स्थान अढळ आहे आणि अनेक मुलांमुलींना कामविषयक कल्पना प्रथम बायबलावरूनच समजतात. बायबलांत स्वसंभोग, समसंभोग, पशुसंभोग, व्यभिचार, बापाचा व मुलींचा समागम, इत्यादि अनेक गोष्टी आहेत आणि हें धार्मिक पुस्तक अत्यंत पवित्र समजतात. एका टीकाकारानें मला असें लिहिलें आहे की पंधरा वर्षे वयाचीं एक मुलगा व मुलगी बायबलांतील कामविषयक गोष्टी शोधून काढून, त्यांवर खुणा करून नंतर दर रविवारी चर्चमधें भेटून पुस्तकांची अदलाबदल करीत असत. तसेंच शेकस्पिअरची एक ' व्हीनस् अँड ॲडोनिस् ' नांवाची कामुक कविता आहे असें ऐकून एका तरुणीने तें पुस्तक मागून आणून तेवढीच कविता वाचली. बायबल हें लिंगशिक्षणाकरता उत्तम पुस्तक आहे असें मी म्हणत नाही, पण त्यांत अनेक बायका करण्याची व रखेल्या ठेवण्याची चाल दाखविल्यामुळे मुलांमुलींना निदान इतकें कळतें की चालू समाजनीति ही सार्वत्रिक नाही. हें मोठेंच शिक्षण आहे आणि शिवाय त्यांतील अश्लील गोष्टी अत्यंत सरळ भाषेंत सांगितलेल्या असल्यामुळे हल्लीच्या ढोंगीपणावर तें उत्तम औषध आहे.

कांही लोकांचें असें म्हणणें आहे का वाङ्मयांतील अश्लीलतेचा परिणाम तरुणांवर वाईट होतो. परंतु याचें कारण हेंच की हल्ली कामविषयक गोष्टी त्यांचे-पासून काळजीपूर्वक लपवून ठेवतात, आणि हें अनैसर्गिक आहे. सरळ अश्लील-तेचा परिणाम मुलांवर वाईट होत नाही आणि अश्लील शब्द बिलकुल न वापरतां केलेल्या उत्तेजक वर्णनांचा परिणाम अधिक वाईट होतो. मॅजिस्ट्रेटांचें मत याचे उलट दिसतें, परंतु याचें कारण त्यांचें अज्ञान. १९०७ सालीं जर्मनींत गुप्तरोग-निवारणासंबंधी एक डाक्तरांची परिषद भरली होती त्यांत या मुद्यावर भर दिला होता की लोकगीतांतील अश्लील भाग काढून टाकून त्यांची मुलांकरता आवृत्ति काढणें गैर आहे, कारण त्यांना कामविषयक ज्ञान मिळायचें तें मिळत नाही. दोन डाक्तरांनी तेथे असें सांगितलें की कामुक गीतांतील वर्णनाप्रमाणे वागण्याचें जोंपर्यंत मुलांचें वय नाही, तोंपर्यंत तें वाचण्यांत नुकसान नाही, आणि तसें वय

असल्यास त्यापासून इजा होत नाही. कोत्या मनाच्या शिक्षकांना पुस्तकांतील जे भाग पसंत नसतील ते काढून टाकल्याने मुलांचें नुकसान होतें. ' एलन् की ' या प्रसिद्ध लेखिकेने लिहिलें आहे की वयांत आलेल्या कोणत्याही मुलाला किंवा मुलीला कोणत्याही उत्तम विस्तृत ग्रंथसंग्रहालयांतून पाहिजे तें पुस्तक घेण्याची मुभा असावी. ( उत्तम संग्रहालयांत अश्लील पुस्तकें नसतात अशी कोणाची कल्पना असल्यास ती चुकीची आहे. उदाहरणार्थ ब्रिटिश म्यूझिअम्चे पुस्तकालयांत इंग्रजींतील प्रत्येक पुस्तकाची प्रत असते. **सं.** ) अमुक वाचा, किंवा अमुक वाचूं नका, असें त्यांना सांगावेंच लागत नाही. न समजणाऱ्या गोष्टी तीं कधीही वाचीत नाहीत. त्या म्हणतात की मुलांकरता सोंवळ्या आवृत्त्या काढणें ही हल्लीच्या शिक्षणपद्धतींतील मोठी चूक आहे. मुलांच्या मनाची व शरीराची वाढ ज्या मानाने झाली असेल त्याला साजेशींच पुस्तकें तीं वाचतात. कामुक वर्णनें मोठ्या माणसांना आवडतात आणि त्यांनीं त्यांचें उत्तेजन होतें व म्हणून त्यांची त्यांना लाज वाटते. मुलांना या वर्णनांत कांहीच वाटत नाही. 'रस्किन्' नें आपल्या 'सिसेम् अँड् लिलीज्' मधे म्हटलें आहे की मुलींना पुस्तकालयांतून पाहिजे तें वाचतां आलें पाहिजे.

"जें वाङ्मयाविषयी सांगितलें तेंच कलेलाही लागू आहे. कलेचे द्वारा अप्रत्यक्ष रीतीने कामशिक्षण होतें. आधुनिक कला या बाबतींत विशेष उपयोगी नाही, परंतु प्राचीन कालांतील नग्न पुतळ्यांची आणि जुन्या इटॅलिअन् नग्न चित्रांची मुलांना जितकी लवकर ओळख होईल तितकी चांगली. अशा नग्नतेची संवय झाल्यास निसर्गांत कांही अश्लील नाही अशी भावना त्यांचे मनांत उत्पन्न होईल. याकरता शाळांतून कलेचे नमुने म्हणून अशीं चित्रें, प्रत्यक्ष वस्तुपाठ म्हणून नव्हे, तर सौंदर्याची संवय व्हावी म्हणून, सार्वजनिक ठिकाणीं लावून ठेवावीं. इटलींत तर शिक्षक मुलांना बरोबर घेऊन संग्रहालयांत अशीं चित्रें पहायला जातात आणि हेंच योग्य आहे. इंग्लंदांत व अमेरिकेंत नग्न चित्रांविरुद्ध जी नेहमी ओरड ऐकूं येते, त्याचें कारण अशा शिक्षणाचा अभाव होय आणि सवच तसे असल्यामुळे या अज्ञानाचा पुष्कळ वेळां विजय होतो. रेव्ह. नॉर्थकोट्

यांनी लिहिलें आहे की नग्नता नेहमीच कामुक नसते आणि उत्तम चित्र कामुक असलें तरीही त्याचा वाईट परिणाम होत नाही. कामुकता वर्ज्य समजल्यास बायबलांतील गोष्टींचीं देखील चित्रें काढतां येणार नाहीत.

" परंतु केवळ चित्रांनीही पुरेसें शिक्षण होत नाही. त्याशिवाय जिवंत, देखण्या माणसांचे नग्न फोटोही दाखवले पाहिजेत. पूर्वीं पुस्तकांत अशीं चित्रें नसत, परंतु डॉ. ष्ट्राझ्ञ यांनी मुलांकरता अशा प्रकारचीं पुस्तकें जर्मनमधे काढलीं आहेत. यांत मुलांचे व मोठ्या माणसांचें नग्न फोटो आहेत. ग्रीक व रोमन लोकांचे वेळच्या चित्रांत निसर्गदृष्टया कांहीं चुका असतात, त्या फोटो पाहिल्याने दुरुस्त होतात उदाहरणार्थ त्यांत गुह्य भागांवरील केस दाखवलेले नसतात. अर्थात् त्या लोकांत ते काढण्याची चाल असल्यामुळें त्यांनी साहजिकपणें चित्रांतही तसेंच दाखवलें, पण त्याने निसर्गाचें ज्ञान मिळत नाहीं. ' फ्रेडरिक् हॅरिसन्' सारख्या लेखकाने असे लिहिलें आहे की ' हे केस न दाखवणें हा चित्रकलेचा नियम इतका जुना, इतका आवश्यक आणि इतका सार्वत्रिक आहे की एखादा चित्रकार हा नियम विसरल्यास असें चित्र किंवा पुतळा पाहून पुरुष संतापतील आणि स्त्रिया लाजून पळून जातील. ' परंतु आईच्या मांडीवर बसून जर स्त्रीपुरुषांचे नैसर्गिक नग्न फोटो पहाण्याची मुलांस संवय होईल तर वरीलप्रमाणे लिहिण्याचा मूर्खपणा तीं करणार नाहीत. "

किर्लोस्करी मासिकें दोन राणीसाहेबांनी बंद केलीं आहेत असें समजतें. यांपैकी एक राणीसाहेबा तरी निदान कालेजांत होत्या हें आम्हास माहीत आहे. कालिदास, शेकस्पिअर वगैरेसारख्या अश्लील लेखकांचा अभ्यास कालेजांत करावा लागतो आणि हीं पुस्तकें अत्यंत पारंपारिक लोकांनीच नेमलेलीं असतात. फडक्यांच्या कादंबऱ्या कालिदासापेक्षा अश्लील असतात काय ? की अश्लीलता संस्कृतांत किंवा इंग्रजींत असलेली चालते व मराठींत चालत नाही ? की फडक्यांची मतें त्यांना पसंत नाहींत म्हणून ही बंदी आहे ? स्वतःला पसंत नसलेलीं मतें लोकांना वाचूं न देणें ही अरेरावी आहे, पण अर्थात् ती त्यांच्या अधिकारांतली गोष्ट आहे.

आमचे मासिकाला डॉ. लेले व इतर कांही लोक नांवें ठेवतात आणि त्याने मुलें बिघडतात असें म्हणतात. हें त्यांचें म्हणणें कितपत खरें आहे याचा वाचकांनीच विचार करावा. अनेक विद्वान विचारवंतांचें म्हणणें आम्हीं वर दिलें आहे व यापेक्षा जास्त लिहिण्याची जरूर दिसत नाही. आमचे कित्येक वर्गणीदार 'आता आमची मुलें मोठीं झालीं, त्यांनी हें वाचूं नये ( निदान आमचे देखत ) अशी आमची इच्छा आहे' म्हणून मासिक बंद करतात. परंतु हेच सोवळे पालक मुलांना घेऊन सौभद्रासारख्या अश्लील व कासुक नाटकाला किंवा त्याहीपलीकडच्या सिनेमाला बिनदिक्कत जातात. या सर्व लोकांना विचार करतां येतो असें म्हणतां येईल काय ? या लोकांची नीति किंवा विनय म्हणजे लोक करतील तसें करायचें, त्याचा परिणाम कांहीही होवो. स्वतंत्र विचार त्यांना करतां येत नाहीं. यांपैकी कांही लोक एखाद्या विशिष्ट बाबीपुरते विचार करणारे असतात, पण त्यांच्या डोक्यांतला तेवढाच कप्पा विचाराला मोकळा असतो व बाकीचे मोहोरबंद असतात. कामविषयक बाबींत विचार करणारे लोक फारच विरळा, कारण या बाबतींत सोवळेपणा लहानपणापासून हाडींमासीं खिळलेला असतो आणि त्या सोंवळेपणाला शास्त्रीय आधार शोधून काढण्याचा प्रयत्न करणें यालाच कांही लोक स्वतंत्र विचार समजतात, परंतु यांत त्यांची स्वतःची व लोकांची फसवणुक मात्र होते. वस्तुतः ते गतानुगतिकच असतात.

# शारदेचें पत्र

बायकांना आपली जबाबदारी केव्हा कळूं लागणार कांहीं समजत नाही. जग आपल्याला नकळत बदलत असतें आणि याचा परिणाम बुरसट सनातन्यांवर देखील नकळत होतो ही एक समाधानाची गोष्ट आहे. गिरजाबाई केळकर देखील आतां बायकांनी केवळ स्वयंपाकघरातच न राहतां स्वयंपाकघराच्या दारांत येऊन बाहेर पहायला कांहीं हरकत नाही, असें मोठ्या उदार अंतःकरणाने सांगूं लागल्या आहेत. पण अजून चांगल्या शिकल्यासवरलेल्या बायकांना देखील असें वाटतें की पुरुषांनी आपल्याला पोसावें इतकेंच नाही तर फुलासारखें वागवावें.

बरें असें वाटलें तरी देखील हें बायकांनीच बोलून दाखवण्यांत कांहीं हंशील नाही हेंही त्यांना समजत नाही. ‘ कला ’ मासिकाच्या ‘ महिला ’ अंकांत सौ. चंद्रकला हाटे एम्. ए. यांनी ‘ फेंकलेलीं फुलें ’ या मथळ्याखालीं जें रडगाणें गाइले आहे, त्याला सुरवातच मुळी फुलांच्या उपमेपासून केली आहे. आणि फुलें खुडून नंतर तीं नकोशीं झालीं म्हणजे फेकून देणें बरोबर नाही हें प्रथम सांगून मग एक स्त्री नकोशी झाली म्हणजे दुसरी करणें बरोबर नाही असें अनुमान काढलें आहे. फुलें हें एक नेहमींचें उपमान आहे खरें, पण ही उपमा येथे लागू पडत नाही याचा त्यांनीं विचार केला नाही. कोणी म्हणेल की चंद्रकलाबाईंनी एकदा फुलें आणलीं, की ती कोमेजलीं तरी जन्मभर तशींच बाळगीत असतील ! फुलें कोमेजलीं आणि त्यांची शोभा नाहीशी झाली म्हणजे कोणीही समंजस मनुष्य तीं टाकून देईल, आणि टाकणेंच योग्य. तेव्हा या उपमेवरून असें होईल की स्त्रीचीही शोभा, म्हणजे तारुण्य आणि सौंदर्य नाहीशीं झालीं म्हणजे तिलाही टाकून द्यावी ! तेव्हा अशी उपमा काय कामाची ? फुलें सुंदर असतात खरीं, पण तीं भलत्याच ठिकाणीं काय उपयोग ?

कांही पुरुष एक बायको नकोशी झाली म्हणजे दुसरी करतात खरे, पण कायद्याने त्यांना पहिल्या बायकोच्या देखील पोटगीची व्यवस्था करावी लागते, आणि ते बहुधा ती करायला तयारही असतात, आणि नसलेच तर त्यांना कायद्याने भाग पाडतां येतें. पण या लेखिकेला तेवढें पुरत नाही, आणि पतीने पत्नीवर जन्मभर प्रेम केलें पाहिजे अशी त्यांची कल्पना दिसते. गडकऱ्यांच्या सिंधूसारख्या बावळट आर्यस्त्रियांचें त्या उदाहरण देतात. ज्या स्त्रिया कर्तव्य म्हणून हलकट नवऱ्याला देखील देव मानतात, किंवा मानतों असें म्हणतात, त्यांचें नवऱ्यावर खरोखर प्रेम असतें असें म्हणतां येईल काय ? प्रेम नसतांही त्या कर्तव्य म्हणून प्रेमाचें ढोंग करतात, कारण पुरुषांवर त्यांचें जीवन ( जेवण ) अवलंबून असतें. पुरुषांना तसें करायचें कांहीच कारण नसतें. लेखिका म्हणते ‘ धर्मेच अर्थेच कामेच नातिचरामि, अशी शपथ घेऊन वरलेल्या धर्मपत्नीचा तो त्याग करतो.’ अशी शपथ घेणें हा मूर्खपणा आहे हें मला कबूल आहे, पण ती नाइलाजानें

घेतलेली असते. शपथ घेतल्याने प्रेम कायम टिकत नाही आणि पुष्कळ लग्नांत मुळी प्रेमाचा संबंधच नसतो. बहुतेक स्त्रिया उदरनिर्वाहाकरता आणि कांही पुरुषही पैशाकरता लग्न करतात. तेथे प्रेमाचा काय प्रश्न ? अशा स्थितींत वरील शपथ घ्यावी लागते म्हणूनच लोक घेतात, आणि जबरदस्तीने घ्यायला लावलेली शपथ लोकांनी पाळली नाही तर त्यांत नवल काय ? प्रेम नैसर्गिक रीतीने उत्पन्न होतें, तें भीक मागून मिळत नाही आणि शपथेने उत्पन्न होत नाही. नवऱ्याला समाजाचा धाक घालूनहि प्रेम उत्पन्न होणार नाही. दुसरें लग्न करू नये असा कायदा झाल्यास पुरुष दुसरें लग्न करणार नाहीत, तरी ते बेकायदा संबंध ठेवतील. पोटगी हक्कानें मागतां येते, प्रेम मागतां येत नाही.

लेखिका आणखी पुढे म्हणते, 'लग्नापूर्वी तिची मानसिक अगर शारीरिक उणीव माहीत नसलेली लग्नानंतर दृष्टोत्पत्तीस येते. अशा ठिकाणीं तें व्यंग नाहीसें करण्याचा प्रयत्न शक्यतोंवर करणें माणुसकीच्या दृष्टीने पतीचें कर्तव्य ठरतें.' माणुसकी स्त्रियांना असण्याचें कांही कारण नाही असें लेखिकेचें मत दिसतें. शारीरिक किंवा मानसिक व्यंग लपवून ठेवून एखाद्या पुरुषाला फसवणें ही माणुसकी आहे का ? मग अशा रीतीने फसल्यावर पुरुषांनी तरी माणुसकी काय म्हणून दाखवावी ? मुलीचें लग्न कांहीही करून झालेंच पाहिजे अशा समजुतीने, किंवा नवऱ्याकडून निदान पोटगी मिळवण्याकरता मुलीच्या बापाने अशा रीतीने राजरोस फसवलें तरी कोर्टाकडून पोटगी मिळते असें घडलेलें आहे. ओळखी-शिवाय झालेल्या लग्नांत तर प्रश्नच नसतो, पण बरीच ओळख झाली तरीही एखादें शारीरिक व्यंग न समजणें शक्य आहे, आणि अशा वेळीं माणुसकी म्हणजे तें व्यंग लग्नापूर्वी स्पष्टपणें सांगणें. अर्थात् हें दोघांसही लागू आहे आणि लेखिके-च्या म्हणण्याप्रमाणे घटस्फोटाचा कायदा झाला तर त्यांत अशा प्रकारची फस-वणूक हें पुरेसें कारण समजावें असें मला वाटतें. त्यांची घटस्फोटाची सूचना मला पसंत आहे, परंतु एकंदरींत स्त्रिया आपल्या पायांवर उभें रहायला शिकल्या-शिवाय त्याचा विशेष उपयोग होणार नाही. त्यांची फुलांची उपमा शेवटीं त्यांनाच नडूं लागली आणि मग त्या सपशेल गोलंटउडी मारून म्हणतात की

पुरुष स्त्रियांना फुलांप्रमाणेच एक सुख देणारी वस्तु समजतात हें गैर आहे. उप-मांचा मोह आवरला असता तर हा घोटाळा झाला नसता.

सनातन्यांनी ज्यांना स्वतःच्या सोयीकरता समाजशास्त्रज्ञ ठरवलें आहे त्या गो. म. जोशांचा याच मासिकाच्या एका जुन्या अंकांत एक लेख आहे. यांचा धंदा म्हणजे कोणत्याही मार्गानें चालू समाजनीति ( यालाच ते आर्य-संस्कृति म्हणतात ) चांगली आणि यूरोपांतील संस्कृति वाईट ठरवण्याचा आहे, आणि याकरता ते आपल्या सोयीप्रमाणे पाश्चात्य लेखकांचेही तुटके आधार देत असतात अर्थात् अशा आधारांना किंमत मुळींच नसते, पण लंगड्या बाजूचे समर्थन करायचें असल्यावर त्यांनीं तरी बिचाऱ्यांनी काय करावें ? एक विष्णु पुराण आणि एक फ्रॉईड् यांतले उतारे देऊन ते सिद्ध ( ? ) करतात कीं वासनांच्या उपभोगाने त्यांचा उपशम होत नाही. याचा अर्थ काय हें त्यांनीं बिलकुल सांगितलेलें नाहीं. खाल्ल्याने भूक नाहीशी होत नाही असें त्यांचें म्हणणें असल्यास तें खोटें आहे त्यांना फारतर इतकेंच म्हणतां येईल की एकदां अन्न खाल्ल्याने भूक कायमची नाहीशीं होत नाहीं. कामवासनेचीही तीच स्थिति आहे. पण वासना नाहीशा व्हायला पाहिजे असतात कोणाला ? सर्व वासना नाहीशा होण्यांत आनंद मानणारा मनुष्य अत्यंत मूर्ख असला पाहिजे. मनुष्याचें सुख वासनांवरच अवलंबून आहे, हेंही या समाजशास्त्रज्ञांना कळत नाही ! अर्थात् हें नुसतें ढोंग आहे, कारण हे तात्विक विचार सांगणारे जोशी अन्नाने भुकेचें शमन करण्याचा प्रयत्न करतात अशी खात्रीलायक बातमी मला समजली आहे. जोशांचें हें ब्रह्मज्ञान केवळ लोकांपुरतें आहे. ते असेंही ह्मणतात 'की संपत्ति आणि सुख यांचा खरोखरच अर्थाअर्थी कांहींही संबंध नाही. उलट असें मात्र ह्मणतां येईल की संपत्ति आणि सुख यांचें प्रमाण नेहमी व्यस्त असेंच राहील.' तरीदेखील हे गृहस्थ शिकवण्या करून पैसे मिळवितात. तेव्हा त्यांना सुखाची इच्छा नाही असें दिसतें. केवढा हा स्वार्थत्याग !

तुझी शारदा.

---

केसरीचे संपादक

# श्री. करंदीकर यांना जाहीर आव्हान.

—×०×—

वि. वि. "जादूचा कानमंत्र" या माझ्या पुस्तकांत 'केसरी' च्या संपादक-मंडळाला आक्षेपार्ह मजकूर आढळला. याकरितां तुम्हीं स्वतः फिर्यादी व स्वतःच न्यायाधीश बनून तिऱ्हाईताकडून माझी चौकशी न करवितां ता. २०।६।३६ रोजीं तुम्हीं मला लेखी नोटीस दिली कीं, 'यापुढें प्रसिद्धीकरितां अथवा अभिप्रायार्थ कोणतेंही पत्र अथवा पुस्तक पाठवूं नये.' ( तुम्हीं स्वतःच असें करितां तर इंग्रज सरकारविरुद्ध हिंदुस्थानांतील संपादकवर्गानें कांगावा करण्याचे मुळींच कारण नाहीं. पूर्वीच्या अवरंगजेबानें मला सोललें असतें व तुम्ही इंग्रज असतां तर चौकशीवांचून मला मंडालेला पाटविलें असतें. यावर लगेच मी ज्ञान प्रकाशांत १०० रु. चें बक्षीस जाहीर केलें; परंतु कोणीही विद्वान पुढें आला नाही. यानंतर जळगांवच्या साहित्यपरिषदेनें हे अवजड काम हातीं घेण्याचें नाकारलें.

आतां आपणालाच जाहीर विनंती करितों कीं, आपण माझ्या पुस्तकांतील चुका व खोटीं विधानें दाखवून द्यावींत. तें न झाल्यास वृद्ध मनुष्याच्या मेंदूंत पुरेसें रक्त जाऊं शकत नाही व त्यामुळें **'वृद्धाला विचार करितां येत नाहीं; याकरितां वृद्धाला मान द्यावा परंतु त्यांच्या मताप्रमाणें नव्या पिढीनें सर्वस्वी वागून चालणार नाहीं '**–हा डॉक्टरी सिद्धांत खराच राहाणार आहे.

आपली विद्वत्ता, सात्त्विक वृत्ती व स्वार्थत्याग याबद्दल मला केसरीच्या इतर संपादकांइतकाच आदर व अभिमान वाटतो. परंतु तेवढ्यावरून वरील सिद्धांत खोटा होऊं शकत नाहीं. या सिद्धांताचा निष्कर्ष असा कीं, केसरीचें मुख्य चालकत्व आपण श्री. य. न. केळकर यांना दिलें तर केसरीला अधिक उजळा येईल. हें अनुभवानेंच खरें ठरणार आहे.

वरील सर्व हकीकत श्री. न. चिं. केळकर यांना माहीत असूनहि त्यांच्याशी बोलण्याचा मला दोन वेळां प्रसंग आला. परंतु त्यांची समतोल वृत्ती व गुणग्राहकता पाहून त्यांच्या वयाच्या मानानें मेंदू अजून तरुण आहे अशी

माझी खात्री झाली. मी त्यांचें अभिनंदन करतों.

तात्विक दृष्ट्या, हिरा [ न. चिं. के. ] व कोळसा ( केसरीचे इतर संपादक ) हीं एकच आहेत. तथापि एका हिरकणीला खंडीभर कोळसे मिळतात असा व्यवहार आहे; आणि हाच अनुभव मला केसरी कंपूच्या गाडीभर कोळशासंबंधानें आला.

हें एवढं मराठी वाचकसंपादकांकरितां लिहिलें. परंतु माझें स्वतःचें इंग्रजी मासिक सुधारलेल्या सर्व देशांतून जातें. याकरितां तिकडल्या संपादकवाचकवर्गाला आमच्या इकडील माहिती व्हावी, म्हणून मी कांहीं संपादकांची चित्रें व मला आलेलीं पत्रें पुढील महिन्यांत छापणार आहे. यामुळें 'कानमंत्रांतील' 'महांकाळी' या माझ्या लेखावरहि प्रकाश पडणार आहे तुम्हीं आपला स्वतःचा व रा. केतकर [ सं. मराठा ] यांचा ब्लॉक छापण्याकरितां पाठविल्यास व्यवसायबंधुत्वानें आभारी होईन. आपल्या शिकवणीप्रमाणें **अन्याय व अपमान मी कधींही सहन करणार नाहीं**

हिंदुस्थानांतील तरुण पिढीनें असेंच वागावें व आपल्या ध्येयाकरितां एक सरळ तर हजार वांकडे मार्गही उपयोगांत आणावेत हेंच टिकविण्याकरितां माझें मासिक व 'जादूची शाळा' आहे. कळावें. आपला

तारीख ७।११।१९३६ — **डॉ. के. भा. लेले.**
संपादक 'इंडियन मॅजिशियन' पुणें.

---


## व्यायाम—३४

७६. ११ व्या आकृतींत दाखवल्याप्रमाणे हात व पायांचीं बोटें जमिनीवर टेकून टांचांवर बसा व एका उडीने पाय मागे फेकून शरीर ताठ करा. सर्व शरीर एका फळींत आहे की नाही तें पहा. नंतर (१) ढुंगण शक्य तितकें मागें न्या व गुडघे जमिनीवर टेका. म्हणजे हात



( आकृति ६५ )


व पाठ एका दिशेंत येतील ( आकृति ६५ ). असें करतांना श्वास बाहेर सोडा. नंतर (२) श्वास आंत घेत मूळपदावर या. असें सहा वेळां करून पुनः पाय एका उडीने पुढे आणा व उठा.




( आकृति ६६ )


७७. वरीलप्रमाणेच टांचांवर बसून हात टेका. नंतर पाय एकदम मागे व वर उंच फेका ( आकृति ६६ ) व लगेच मूळपदावर या. पायांचीं बोटें जमिनीपासून सुमारें ३९ इंच उंच गेलीं पाहिजेत व शरीर खांद्यांवर बरोबर तोलून धरलें पाहिजे. असें ४ वेळां करा.

७८. प्रथम ताठ उभे राहून खांदे शक्य तितके खाली आणा व आणतांना श्वास बाहेर सोडा (आकृति ६७). नंतर खांदे शक्य तितके वर नेतांना श्वास आंत घ्या (आकृति ६८). असें ५–६ वेळां करा.





७९. सरळ ताठ उताणे निजा व हात



(आकृति ६७) (आकृति ६८) (आकृति ६९)

डोक्याचे मागे लांब करा. नंतर हात एकदम पुढे आणून, श्वास बाहेर सोडून पायांचे बोटांना स्पर्श करण्याचा प्रयत्न करा ( आकृति ६९ ). स्पर्श झाल्यावर,

किंवा तो न करतां आल्यास त्याच्या शक्य तितकें जवळ पोंचल्यावर, पुनः मूळ पदावर या. आरंभीं एकदोन वेळां, व नंतर चार वेळां करा. ( समाप्त. )

---

# पोंच व अभिप्राय

**वादळांतील नौका.** लेखक, प्रो. लक्ष्मणराव सरदेसाई. प्रकाशक, बा. द. सातोस्कर, बी. ए., सागरसाहित्य, त्रिभुवन रोड, मुंबई नं. ४ पृष्ठसंख्या ११६. किंमत १ रु.

सरदेसाई यांनी लघुकथालेखनांत अगोदरच कीर्ति मिळवली आहे. प्रस्तुतचा कथासंग्रह कदाचित् त्यांच्या पूर्वीच्या संग्रहांपेक्षांही सरस म्हणतां येईल, तथापि विनाकारण सृष्टिवर्णन देत बसण्याची त्यांची संवय कायम आहे, आणि कांही ठिकाणी अनौचित्य दिसतें. उदाहरणार्थ पान ७ वर सुहास आपल्यावर प्रेम करणाऱ्या स्त्रीबद्दल 'बाजारबसवी' हा शब्द वापरतो व मग कांहीतरी सबब सांगतो. तो हलकट आहे ही गोष्ट खरी, पण जर त्याला तिच्या पैशाचा फायदा घ्यायचा आहे तर हलकट मनुष्य काळजीपूर्वक बोलेल. त्याचप्रमाणे पान ७७ वर रमेशला मातिल्देने आपल्याकडे रहाण्याचा आग्रह केल्यावरून तो कबूल करतो, आणि तिने आपल्या निजण्याच्या खोलींत त्याला फराळाला दिलें, तेव्हा 'रमेशने बूट पाटलूण काढली, हात तोंड धुतलें आणि थोडीं फळें खाऊन हात धुतले,' हें वर्णन जरा चमत्कारिक आहे. गोव्यांत पाटलूण घालणारे सर्वच लोक आंत धोतरही नेसतात की काय हें माहीत नाही, पण जेथे तशी पद्धत नसेल तेथील वाचकांस हें चमत्कारिक वाटेल ( अश्लील वर्णन करण्याचा लेखकाचा उद्देश नसावा असें वाटतें ). वर्णन करतांना अधिक काळजी घेणें इष्ट आहे.

—डॉ. के. भा. लेले कळवतात कीं त्यांचें 'हस्तछायाचित्रें' हें पुस्तक कोणा संपादकास समालोचनार्थ पाहिजे असल्यास त्यांचेकडे दोन आण्यांचीं तिकिटें पाठवावीं. ( ८४७ सदाशिव, पुणें-२ )